---

नवऱ्याचं डोकं खूप दुखत होतं... बायको डोकं दाबून देत होती...
डोकं दाबता दाबता बायकोनं हळूच विचारलं...
बायको : अहो, लग्नाआधी तुमचं डोकं कोण दाबायचं..?
नवरा : लग्नाआधी डोकेदुखी नव्हती...

---

बायकोला बरं वाटत नव्हतं... नवरा तिला घेऊन डॉक्टरांकडे गेला..
डॉक्टरांनी ताप चेक करण्यासाठी तिच्या तोंडात थर्मामीटर ठेवलं...
डॉक्टरांनी महिलेला काही वेळ तोंड बंद ठेवण्यास सांगितलं..
तितक्यात काही इतर कामं आल्यानं डॉक्टरांचं महिलेकडे दुर्लक्ष झालं...
महिला गप्प बसून होती.. २-५ मिनिटं अशीच गेली...
नवरा बायकोकडे पाहत होता... अखेर न राहवून त्यानं डॉक्टरांना विचारलं...
"डॉक्टर साहेब, ही जादुई वस्तू कितीला मिळते हो..?"

---

एक मित्र दुसऱ्या मित्राच्या घरी आला....
पहिला मित्र : काय रे काय झालं..?
दुसरा मित्र : बायकोनं घराबाहेर काढलं...
पहिला मित्र : तू काय केलंस...?
दुसरा मित्र : काही नाही रे.. फक्त एक डास मारला घरात...
पहिला मित्र : एक डास मारला म्हणून थेट घराबाहेर हाकललं तुला..?
दुसरा मित्र : तो डास बायकोच्या गालावर बसला होता..

---